# विकासकामांमध्ये काही वेळा ‘लालफीतशाही’चा अडथळा

## सरन्यायाधीश भूषण गवई यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**नागपूर :** नागपूरमध्ये महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठाच्या निर्मितीत आलेल्या अडचणींचा उल्लेख करताना सरन्यायाधीश भूषण गवई यांनी नोकरशाहीतील लालफितशाहीवर टीका केली. काही वेळा विकासकामे करताना ही लालफितशाही अडथळा ठरत असल्याचेही सरन्यायाधीश म्हणाले.

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते रविवारी नागपूरमधील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठातील नव्या प्रशासकीय इमारतीचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी मंचावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, सर्वोच्च न्यायालयाचे न्या. दीपंकर दत्ता, न्या. प्रसन्ना वराळे, न्या. अतुल चांदूरकर, माजी न्यायमूर्ती विकास सिरपूरकर, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराध्ये, नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, न्या. अनिल किलोर, न्या. भारती डांगरे यांच्यासह सॉलिसिटर जनरल ऑफ इंडिया ॲड. तुषार मेहता, राज्याचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ उपस्थित होते.महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठाचे कुलपती असलेल्या सरन्यायाधीशांनी नागपूरमध्ये विद्यापीठ स्थापन करण्याबाबत माहिती दिली. २०१६ साली नागपूरमधील विधि विद्यापीठाचे भूमिपूजन झाले. विद्यापीठाच्या उभारणीसाठी जमीन शोधण्यात अनेक अडचणी आल्या. यात नोकरशाहीनेही अडथळे टाकण्याचे प्रयत्न केले. शेवटी उच्च न्यायालयाने याबाबत आदेश पारित केले. जमीन निश्चित झाल्यावर निधीबाबत अनेक समस्यांचा सामना करावा लागला, असे सरन्यायाधीश म्हणाले. सुमारे दशकभराच्या संघर्षमय प्रवासानंतर विधि विद्यापीठाच्या विकासाचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. शासनाच्या मदतीने जागतिक स्तराचे विद्यापीठ तयार झाले आहे, मात्र आता शैक्षणिक गुणवत्तेवर लक्ष देण्याची गरज असल्याचे मत न्या. गवईंनी व्यक्त केले. नागपूरमध्ये विधि विद्यापीठ स्थापित करण्यात न्या. गवई यांचे विशेष योगदान असल्याचा उल्लेख गडकरी यांनी केला. तंत्रज्ञानाच्या मदतीने न्यायव्यवस्थेत जनतेच्या हिताचे बदल होतील, अशी अपेक्षाही गडकरींनी व्यक्त केले. प्रास्ताविक विद्यापीठाचे कुलगुरू विजेंदर कुमार यांनी केले तर आभार कुलसचिव रागिनी खुबाळकर यांनी मानले.

### ‘न्यायप्रणाली जलद करण्याचे प्रयत्न’

भारत जगातील चौथी आर्थिक सत्ता बनलेली आहे. त्यामुळे येत्या काळात वाणिज्यिक वादांची संख्या वाढणार आहे. हे वाद लवकर निकाली काढण्यासाठी विधि विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे आवश्यक आहे. यामुळे देशात अधिक गुंतवणूक होण्यास मदत होईल, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. नव्या काळातील सायबर गुन्हे, कृत्रिम बुद्धिमत्ता या आव्हानांनाही सामोरे जाण्याची क्षमता तरुण वकिलांमध्ये निर्माण करावी लागेल. याशिवाय याच तंत्रज्ञानाचा वापर करून न्यायप्रणाली अधिक जलद करण्याचे प्रयत्न करण्याचे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

# ‘सारथी’ला निधी कमी पडू देणार नाही

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** ‘यूपीएससी’, ‘एमपीएससी’मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी प्रशासनात लोकाभिमुख काम केले पाहिजे. समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांना मदत करणे आवश्यक आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ‘सारथी संस्थेच्या कामाला गती देण्याचे काम शासनामार्फत करण्यात येत आहे. त्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही,’ अशी ग्वाही दिली.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) या संस्थेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात यूपीएससी परीक्षेतील नऊ, एमपीएससी परीक्षेतील ९१ यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार पवार यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. सारथी संस्थेचे अध्यक्ष अजित निंबाळकर, संचालक उमाकांत दांगट, मधुकर कोकाटे, डॉ. नवनाथ पालकर, किशोरराजे निंबाळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, ‘सारथी’चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शिवाजी पाटील यावेळी उपस्थित होते. याच कार्यक्रमात ‘सारथी’च्या यशोगाथांवर आधारित ‘विजयी भव’ व ‘सारथी उपक्रम माहिती’ या पुस्तकांचे प्रकाशन झाले. पवार म्हणाले, ‘विविध योजनांचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना होण्यासाठी ‘सारथी’च्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी येणाऱ्या काळात सामाजिक जबाबदारी म्हणून नवीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. तसेच, संस्थेचा नावलौकिक वाढवा. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाला साजेसे काम विद्यार्थ्यांनी करावे. राज्यातील शासकीय, निमशासकीय, खासगी संस्था या सर्वांच्या कार्याचा आदर्श राजर्षी छत्रपती शाहू महाराजच आहेत.’

‘राज्यात १९८० च्या दशकात ‘यूपीएससी’, ‘एमपीएससी’मध्ये निवड होण्याचे प्रमाण हे नगण्य होते. गेल्या चार ते पाच वर्षांत त्यात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. आगामी काळात सारथीकडून प्रशासकीय अधिकारी तयार होऊन राज्याच्या विकासास मोठी गती मिळेल,’ अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# एसटीला एक कोटीचा दंड



**दंडाचे स्वरूप**

| | |
|---|---|
| वेगमर्यादा ओलंडणे | ४,000 रु. |
| लेन कटिंग | १,000रु. |
| सिग्नल मोडल्यास | ५00रु. |
| गर्दीच्या ठिकाणी वाहन थांबविणे | १,000- १,५00 रु. |
| थांब्याशिवाय अन्यत्र वाहन थांबविणे | १,000 - १,५00 रु. |

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या बस मुंबई- पुणे महामार्गावर अतिवेगाने किंवा मार्ग बदलून मार्गक्रमण करणाऱ्या बसवर दंडात्मक कारवाई केली जाते. जानेवारी ते एप्रिल या कालावधीत ३,३३१ वाहतुकीचे नियम मोडण्याच्या घटना घडल्या असून याद्वारे एसटी चालकांकडून १.३३ कोटी रुपयांची दंडवसुली करण्यात आली आहे.

राज्याच्या मोटार परिवहन विभागाने मुंबई -पुणे महामार्गावरील वाहनांना शिस्त लावण्यासाठी इंटरसेप्टर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. वाहन अति वेगाने चालवल्यास त्या कॅमेऱ्यात वाहनाच्या क्रमांकाची नोंद होऊन त्या वाहनाच्या मालकाला इ-चलन पाठवले जाते. तसेच घाटात ताशी ४० किमी आणि रस्त्यावर ताशी ८० किमी कमाल वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. अवजड वाहने रस्त्याच्या डाव्या बाजूच्या मार्गिकेतून चालविणे बंधनकारक आहे. एसटी बस अवजड वाहनांच्या कक्षेत येत असल्याने, एसटी बसने दुसऱ्या अथवा पहिल्या मार्गावरून प्रवास केल्यास नियम मोडला जातो. त्यामुळे एसटीचे ई-चलन काढले जाते.

# ट्रम्पधार्जिण्या धोरणांमुळे जिंकलेली लढाई हरलो

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

## ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे मत

**नागपूर :** चालून आलेली एकही संधी सोडायची नसते, हा राजकारणातला पहिला नियम आहे. देशाच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या युद्धात बांगलादेशच्या रूपाने पाकिस्तानचे तुकडे करीत हे धाडस केले. अगदी तशीच सुवर्ण संधी पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने केलेल्या ऑपरेशन सिंदूरने निर्माण करून दिली होती. दहशतवाद्यांचे केंद्र असलेल्या पाकिस्तानला कायमची अद्दल घडवत त्याचे पाच तुकडे करता आले असते. मात्र ट्रम्प धार्जिण्या सरकारने ही संधी गमावल्याने देशाला जिंकलेल्या युद्धातून माघार घ्यावी लागली, असे वंचित बहुजन आघाडीचे नेते आणि माजी खासदार ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ठणकावून सांगितले.

निमित्त होते, ऑपरेशन सिंदूर आणि नंतरच्या घडामोडी हा विषय केंद्रस्थानी ठेवून आयोजित विशेष व्याख्यानाचे. कस्तुरचंद पार्कजवळील परवाना भवनच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला. ॲड. आंबेडकर म्हणाले, आगामी काळातील महायुद्धे ही जमिनीसाठी नव्हे तर अर्थव्यवस्थेचा ताबा मिळवण्यासाठी लढली जातील, अशी तर्कशुद्ध मांडणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ७५ वर्षांपूर्वी केली होती. सध्या जगाच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल पाहता, त्यांचे हे विश्लेषण तंतोतंत खरे ठरत आहे.

देशातील मुस्लीम भविष्यात छातीवर बसतील, अशी ओरड धर्मांध शक्ती पूर्वीपासून करीत आहे. वास्तविक पाकिस्तानातील मुस्लीम आणि भारतीय मुस्लिमांमध्ये टोकाचा फरक आहे. ‘व्हिलन’च्या भूमिकेत बसवलेल्या मुस्लिमांची सुटका कधी करणार, असा थेट सवाल ॲड. आंबेडकर यांनी उपस्थित केला. आज गुळगुळीत राजकारणाचे पेव फुटले आहे.

काही बोलायला गेले तर मागच्या चुकांचा पाढा वाचला जातो. देशापेक्षा स्वतःचे महत्त्व कसे वाढेल, यावर वर्तमानातील राजकारण्यांचा भर आहे, असे त्यांनी नमूद केले.

विचारांचा धगधगता अंगार हा बहुजन चळवळीचा आत्मा होता. तोच हरवल्याची खंत व्यक्त करीत ॲड. आंबेडकर म्हणाले, फुले-शाहू-आंबेडकर चळवळीने घेतलेले मौन धोकादायक आहे. देशाला संकटात टाकणाऱ्या विचारांविरोधात हिमतीने, निर्भयतेने मतदान केले पाहिजे, अशी साद आंबेडकर यांनी घातली.

### चारित्र्यहीन देशाच्या सत्तेवर असेल तर...

चारित्र्यहीन जर देशाच्या सत्तेवर बसला तर अर्थव्यवस्था ताब्यात घेणे सोपे होते. जगाच्या पाठीवर सर्वत्र हेच घडत आहे. वयोवृद्धांच्या प्रदेशात क्रयशक्ती संपत चालल्याने जगाची अर्थव्यवस्था कोलमडत आहे. दुसऱ्या बाजूला क्रयशक्ती वाढत चाललेला भारत मोठी बाजारपेठ बनत आहे. त्यामुळे देशात आगामी काळात शांतता राखायची असेल तर आपली बाजारपेठ कोणाला, किती आणि कशी खुली करून द्यायची, हे भारताने ठरवण्याची वेळ आली आहे, असे ॲड. आंबेडकर म्हणाले.



# संत तुकाराम महाराज पालखी सोहळा इंदापुरात

**लोकसत्ता वार्ताहर**

**निमगाव :** केतकीकरांचे आदरातिथ्य व भावपूर्ण निरोप घेऊन जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने पंढरीच्या मार्गावरील इंदापूर मुक्कामी सकाळी मार्गक्रमण केले. तत्पूर्वी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते पादुकांची आरती झाली.

अखंड हरिनामाच्या गजरात ज्ञानोबा-तुकोबाच्या जयघोषात मजल दरमजल करीत हा सोहळा सोनाई उद्योग समूहाच्या प्रांगणात आला. या वेळी सोनई उद्योग समूहाचे प्रमुख दशरथ माने, विष्णू कुमार माने, प्रवीण माने यांच्या वतीने वारकऱ्यांना अल्पोपाहार देण्यात आला. नंतर गोकुळीच्या ओढ्यात विश्रांती घेऊन पालखी सोहळ्याने इंदापूरकडेवाटचाल केली. रिंगण सोहळ्यासाठी पालखी कदम विद्यालयाच्या प्रांगणात आली. या वेळी माजी खासदार राहूल शेवाळे, माजी नगराध्यक्ष प्रदीप गारटकर, भरत शहा, राजवर्धन पाटील, कैलास कदम आदींनी पालखी सोहळ्याचे जंगी स्वागत केले. या वेळी इंदापूर पंचक्रोशीतील हजारो नागरिक उपस्थित होते.

पालखी विसावल्यानंतर रिंगण सोहळ्याला सुरुवात झाली. पालखी रथाने प्रथम रिंगणाला प्रदक्षिणा घातली. नंतर पालखी मंचावर घेण्यात आली. रिंगणामध्ये प्रथम वारकऱ्यांच्या पताका फडकल्या. पताकाधारी वारकरी आपले रिंगण पूर्ण करत असताना एकच लयबद्ध पताकांच्या सळसळीने जणू आसमंतही भक्तिरसात न्हाले. पाठोपाठ डोईवरी तुळशी वृंदावन घेऊन वैष्णव भगिनींनी अत्यंत उत्साहाने आपले रिंगण पूर्ण केले. नंतर पाण्याचा हंडा डोक्यावर तोलून या वैष्णव भगिनींनी आपले रिंगण पूर्ण केले.

त्यानंतर प्रथम मानाच्या अश्वाने वायुवेगाने प्रदक्षिणा पूर्ण केली आणि भाविकांनी हरिनामाचा एकच जयघोष केला. अश्वाने आपले रिंगण पूर्ण करताच पुन्हा हरिनामाचा गजर झाला आणि अश्वाच्या टापाखालील धूळ कपाळी लावण्यासाठी भाविक भक्तिभावाने नतमस्तक झाले.

रिंगण सोहळ्यानंतर पालखी सोहळा मुक्कामासाठी नव्याने बांधण्यात आलेल्या पालखी तळावर दाखल झाला. त्यानंतर रविवारी दिवसभर पादुकांच्या दर्शनासाठी नागरिकांनी रांगा लावल्या होत्या.

### संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी बरड मुक्कामी



वैष्णवांचा मेळा फलटणनगरीतील आपला मुक्कामाहून पुढे माउलींच्या पालखीने आज सकाळी पंढरपूरच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले. ‘हरिनामाचा गजर’ करत पालखी रविवारी सायंकाळी सातारा जिल्ह्याच्या सीमेवरच्या बरड (ता. फलटण) गावी विसावली. आज सकाळची आरती आणि निघण्याचा भोंगा झाल्यावर पालखी बरडकडे मार्गस्थ झाली. सकाळी विडणी येथे चहापान झाले. तेथील नीरा नदीच्या रामरामोशी पुलावर माउलींच्या स्वागतासाठी मोठी गर्दी झाली होती. नुकत्याच झालेल्या पावसाने नदीला पाण्याचा विसर्ग सोडल्याने नीरा नदीचे पात्र भरून वाहत आहे. पालखी सोहळ्याने नीरा नदीला प्रदक्षिणा घालत बरडकडे प्रस्थान ठेवले. पालखी दुपारी दोनच्या दरम्यान पिंपरद येथे दुपारच्या विसाव्यासाठी व न्याहरीसाठी थांबली. या वेळी चोहोबाजूंनी माउलींचा गजर सुरू होता. रात्रीच्या मुक्कामासाठी सहा साडेसहाच्या दरम्यान माउलीची पालखी बरड (ता. फलटण) येथे दाखल झाली.

# राजेश कुमार नवे मुख्य सचिव

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुख्य सचिव सुजाता सौनिक या निवृत्त होत असल्याने अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार यांची नवीन मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात येणार आहे.

या संदर्भातील आदेश सोमवारी काढण्यात येणार आहे. सुजाता सौनिक या सोमवारी निवृत्त होत आहेत. मुख्य सचिव पदासाठी अनेक अधिकाऱ्यांची नावे चर्चेत होती. पण ज्येष्ठतेनुसार राजेश कुमार यांची मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

# नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांनी देश व्यापला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांनी रविवारी रोजी संपूर्ण देश व्यापला आहे. यंदा नऊ दिवस अगोदरच मोसमी वाऱ्यांनी संपूर्ण देश व्यापला आहे. देशात सर्वदूर मोसमी पाऊस पडण्यास अनुकूल वातावरण असून, पुढील पाच दिवस देशाच्या बहुतेक भागांत चांगला पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजित वेळेनुसार, साधारणपणे ८ जुलै रोजी नैर्ऋत्य मोसमी पाऊस संपूर्ण देश व्यापतात. यंदा नऊ दिवस अगोदर २९ जून रोजीच मोसमी वाऱ्यांनी सर्व देश व्यापला आहे. एक जून रोजी केरळमध्ये दाखल होणारा पाऊस यंदा लवकर २४ मे रोजी दाखल झाला. त्यानंतर २५ मे रोजी मोसमी पाऊस तळकोकणात दाखल झाला. लगेच दुसऱ्या दिवशी मोसमी वाऱ्यांनी आगेकूच सुरू केली. मुंबईसह, पुणे आणि इतर काही भागात २६ मेपासून धडक दिली आणि १७ जून रोजी संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. यंदा केरळमध्ये वेळेआधीच मोसमी पाऊस दाखल झाला. सर्वसाधारण तारखेच्या ९ दिवस आधी निकोबारमध्ये, ८ दिवस आधी केरळमध्ये आणि १३ दिवस आधी महाराष्ट्रात दाखल झाला. देशभरात १ जूनपासून सरासरीपेक्षा ९ टक्के तर, राज्यात १० टक्के जास्त पाऊस झाला आहे.

### पुढील पाच दिवस पावसाचे

#### कोकण, मध्य महाराष्ट्रात मुसळधार

कोकण किनारपट्टीसह मध्य महाराष्ट्रात पुढील चार ते पाच दिवस मुसळधार पाऊस पडेल. काही ठिकाणी अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. विदर्भात पुढील दोन दिवस मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो. मराठवाड्यात हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे, असा अंदाजही हवामान विभागाने व्यक्त केला आहे. रत्नागिरी, सातारा जिल्ह्याला सोमवारी दक्षतेचा इशारा असून संपूर्ण विदर्भ, रायगड आणि पुणे जिल्ह्याला सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.


लोकसत्ता लोकमान्य लोकशक्ती

उद्यमशील महाराष्ट्राची वाढ हीच खरी समृद्धी...



लोकसत्ता उद्योगसंपन्न महाराष्ट्र चर्चासत्र २०२५

व्यवसायसुलभ वातावरण, वीज, पाणी, शिक्षित-प्रशिक्षित मनुष्यबळाची उपलब्धता, महामार्गांचे विस्तारित जाळे आणि निर्यात वाढीसाठी प्रोत्साहन यात आहे महाराष्ट्राची उद्यमशीलता. देशी-विदेशी गुंतवणूकदारांना महाराष्ट्राकडे या घटकांनी खेचून आणले. उद्यमशील महाराष्ट्राच्या जडणघडणीतील आगामी संधी, तसेच आव्हाने आणि त्या दिशेने उपाय व सज्जतेसाठी उद्योजक, विश्लेषक, प्रशासन आणि धोरणकर्ते यांना एकाच व्यासपीठावर आणणारे **लोकसत्ता उद्योगमंथन!**

॥ उद्यमात् सकल समृद्धिः ॥ MIDC प्रस्तुत

लोकसत्ता RTC उद्योग ROUND TABLE CONFERENCE

**सहभाग:**
**दिनेश जोशी**, अध्यक्ष, सत्यगिरी समूह, सह-अध्यक्ष, फिक्की-महाराष्ट्र
**प्रतीक अग्रवाल**, व्यवस्थापकीय संचालक, स्टरलाईट इलेक्ट्रिक
**अनंत गोएंका**, उपाध्यक्ष, आर पी जी ग्रुप
**राधाकृष्णन बी**, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, महाजेनको
**दीपेंद्र सिंग कुशवाह**, विकास आयुक्त, महाराष्ट्र शासन

**समारोपाचे भाषण: पी.वेलारासू**, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी eventloksatta@gmail.com वर आपल्या उद्योगाशी संबंधित तपशील थोडक्यात पाठवा. निवडक उद्योजकांना परिसंवादात सहभागी केलं जाईल.

※ प्रवेश फक्त निमंत्रितांसाठी

पॉवर्ड बाय- WORLD TRADE CENTER MUMBAI | aIA All India Association of Industries


pnb Housing Finance Limited — Ghar Ki Baat

**APPENDIX -IV-A - E-AUCTION-PUBLIC SALE NOTICE of IMMOVABLE PROPERTY/IES**

**E-AUCTION-SALE NOTICE FOR SALE OF IMMOVEABLE ASSETS UNDER THE SECURITISATION AND RECONSTRUCTION OF FINANCIAL ASSETS AND ENFORCEMENT OF SECURITY INTEREST ACT, 2002 READ WITH PROVISO TO RULE 8(6) OF THE SECURITY INTEREST (ENFORCEMENT ) RULES, 2002 )**

Reg. Off.:- 9th Floor, Antriksh Bhawan, 22 Kasturba Gandhi Marg, New Delhi–110001, Phones:-011-23357171, 23357172, 23705414, Web:-www.pnbhousing.com

**B.O. NAGPUR: 1st Floor, AchrajtowerII, Chindwwararoad, Chhaoni Square, Sadar, Nagpur-440001**

Notice is hereby given to the public in general and in particular to the borrower(s) & guarantor(s) indicated in Column no-A that the below described immovable property (ies) described in Column no-D mortgaged/charged to the Secured Creditor, the constructive/Physical Possession of which has been taken (as described in Column no-C) by the authorized Officer of **M/s PNB Housing Finance Limited**/Secured Creditor, will be sold on **“AS IS WHERE IS, AS IS WHAT IS and WHATEVER THERE IS BASIS”** as per the details mentioned below. Notice is hereby given to borrower(s)/mortgagor(s)/Legal Heirs, Legal Representative, (whether Known or Unknown), executor(s), administrator(s), successor(s), assignee(s) of the respective borrowers/ mortgagor(s)(since deceased) as the case may be indicated in Column no-A under Rule-8(6) & 9 of the Security Interest Enforcement Rules, 2002 amended as on date. For detailed terms and conditions of the sale, please refer to the link provided in **M/s PNB Housing Finance Limited/secured creditor’s website i.e. www.pnbhousing.com.**

| Loan No. Name of the Borrower/ Co- Borrower/Guarantor/Legal heirs(A) | Demanded Amount & Date (B) | Nature of possession (C) | Description of the Properties mortgaged (D) | Reserve Price (RP) (E) | EMD (10% of RP) (F) | Last Date of Submision of Bid (G) | Bid Incremental Rate (H) | Inspection Date & Time (I) | Date of Auction & Time (J) | Known Encumbrances/Court Case if any (K) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| NHL/NAG/1218/623366 & HOU/NAG/1218/619743 Abhijit Wasudeorao Bijwar / Vishakha Abhijit Bijwar / Sitaram Timber Mart, B.O. : NAGPUR | Rs. 90,64,020.05 & 22-06-2021 | Physical Possession | Flat No 302,third Floor, A Wing, Jai Hanuman Appt, Beside Harihar Mandir, Plot No 05, Lakadganj, Nagpur, Maharashtra - 440002, India. | Rs. 5,163,000 | Rs. 5,16,300 | 16-07-25 | Rs. 20,000 | 14-07-2025 12:00pm to 04:00pm | 17-07-2025 2PM to 03:00PM | Not Know |
| HOU/NAG/0620/800265 M/s Krupa Incorporation / Sejal Nimish Mehta / Nimish Kishorlal Mehta / Premier Enterprise, B.O. : NAGPUR | Rs. 1,33,89,511.44 & 13-03-2025 | Symbolical Possession | Plot No 235,civil Station, Expansion Scheme, Nit Kh No 145 146, Mz Lendra Ramdaspeth, City Survey No 795 Bearing Corporation House No 423, Nagpur Maharashtra - 440010 India. | Rs. 14,440,000 | Rs. 14,44,000 | 04-08-25 | Rs. 50,000 | 24-07-2025 12:00pm to 04:00pm | 05-08-2025 2PM to 03:00PM | Not Know |

***Together with the further interest @18% p.a. as applicable, incidental expenses, cost, charges etc. incurred upto the date of payment and/or realization thereof. ** To the best knowledge and information of the authorized Officer of PNB Housing Finance Limited, there are no other encumbrances/ claims in respect of above mentioned immovable/secured assets except what is disclosed in the Column No.-K. Further such encumbrances to be catered/paid by the successful purchaser/bidder at his/her end. The prospective purchaser(s)/bidders are requested to independently ascertain the veracity of the mentioned encumbrances. (1.)** As on date, there is no order restraining and/or court injunction PNBHFL/the authorized Officer of PNBHFL from selling, alienating and/or disposing of the above immovable properties/secured assets and status is mentioned in column no-K **(2.)** The prospective purchaser/bidder and interested parties may independently take the inspection of the pleading in the proceedings/orders passed etc. if any, stated in column no-K. Including but not limited to the title of the documents of the title pertaining thereto available with the PNBHFL and satisfy themselves in all respects prior to submitting tender/bid application form or making Offer(s). The bidder(s) has to sign the terms and conditions of this auction along with the Bid Form. **(3.)** Please note that in terms of Rule 9(3) of the Security Interest (Enforcement) Rules, 2002, the bidder(s)/the purchaser is legally bound to deposit 25% of the amount of sale price, (inclusive of earnest money) on the same day or not later than next working day. The sale may be confirmed in favour of (bidder(s) only after receipt of 25% of the sale price by the secured creditor in accordance with Rule 9(2) of the Security Interest (Enforcement) Rules, 2002. The remaining 75% of the s sale consideration amount has to be deposited by the purchaser within 15 days’ from the date of acknowledgement of sale confirmation letter and in default of such deposit, the authorized officer shall forfeit the part payment of sale consideration amount within 15 days from the date of expiry of mandatory period of 15 days mentioned in the sale confirmation letter and the property/secured asset shall be resold as per the provisions of Sarfaesi Act. **(4.) M/s C1 India Private Limited would be assisting the Authorised officer in conducting sale through an e-Auction having its Corporate office at Plot No. 68, 3rd Floor, Sector 44, Gurgaon, Haryana 122003 Website - www.bankeauctions.com For any assistance related to inspection of the property or obtaining the Bid Documents and for any other query or for registration, you have to co-ordinate with VIVEK LOADHA Toll Free No. - 1800 120 8800, E-Mail: auction@pnbhousing.com, is authorised Person of PNBHFL or refer to www.pnbhousing.com.**

**PLACE :- NAGPUR** **DATE :- 30.06.2025**

**SD/-AUTHORIZED OFFICER, PNB HOUSING FINANCE LIMITED**